# पश्चिम बंगालमध्ये पोलिसांनी उतरवले १२७९ मशीदींचे भोंगे

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**पश्चिम बंगालमध्ये ध्वनीप्रदूषणाविरोधात राज्य पोलिसांनी मोठी मोहीम हाती घेत दोन दिवसांत सुमारे १,५०० धार्मिक स्थळांवरील भोंगे (लाऊडस्पीकर) हटवण्याची कारवाई केली आहे.**



- ध्वनीमर्यादा उल्लंघनप्रकरणी १,२७९ मशिदी आणि १९९ मंदिरांना कारवाई; सर्व धर्मांवर समान निकष लागू असल्याचा पोलिसांचा दावा.
- लाऊडस्पीकर हटवण्या–बाबत तोंडी सूचना दिल्याचा व्यवस्थापन समित्यांचा दावा; लेखी आदेश न मिळाल्याची प्रतिक्रिया.

ध्वनीप्रदूषणाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेत ही कारवाई करण्यात आली असून, राज्यातील ध्वनीप्रदूषण नियंत्रण नियमांनुसार ही मोहीम राबविण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निर्धारित ध्वनीमर्यादेचे उल्लंघन केल्याप्रकरणी राज्यातील किमान १,२७९ मशिदी आणि १९९ मंदिरांना लाऊडस्पीकर हटवण्याचे निर्देश देण्यात आले. ही कारवाई संपूर्ण राज्यभर ध्वनीप्रदूषणाविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेचा भाग असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, कोणत्याही धर्माला लक्ष्य न करता सर्व धार्मिक स्थळांवर समान निकषांनुसार कारवाई केली जात आहे. या मोहिमेद्वारे संबंधित धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनांना सार्वजनिक ध्वनिवर्धक यंत्रणा हटवण्यासह ध्वनीप्रदूषण नियंत्रणाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पश्चिम बंगाल ध्वनीप्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम, २००० नुसार, सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत सार्वजनिक लाऊडस्पीकर वापरण्यासाठी पोलिसांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच, ध्वनीची तीव्रता नियंत्रित ठेवण्यासाठी साउंड लिमिटर वापरणे आवश्यक असून, आवाजाची पातळी ५० ते ७५ डेसिबल या निर्धारित मर्यादेत ठेवणेही अनिवार्य आहे.

दरम्यान, अनेक मशिदी आणि मंदिरांच्या व्यवस्थापन समितीच्या प्रतिनिधींनी स्थानिक पोलिसांनी तोंडी सूचना देऊन लाऊडस्पीकर हटवण्यास सांगितल्याचा दावा केला आहे. याबाबत कोणताही लेखी आदेश देण्यात आलेला नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

www.newsdanka.com

राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र. : MAHMAR/2022/83413

संपादकीय

'शहा'निशा सुरू झाली, फंडिंगचे पुरावे समोर आले

>> पान...२

मुंबई | शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ >> वर्ष ५ >> अंक ९४ >> पाने ६ >> किंमत ५ रुपये | मुख्य संपादक : दिनेश कानजी

## भाजपने नव्हे, काँग्रेसने केले माझ्या पत्नीला ट्रोल!

**सोनम वांगचुक यांनी दाखवला दोन पक्षांतील फरक**

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com





**'माझी पत्नी गीतांजली यांनी राहुल गांधींबाबत केवळ एकच टिप्पणी केली पण त्यावरून काँग्रेसने आम्हाला सोशल मीडियात खूप ट्रोल केले. मात्र भाजपवर आम्ही कठोर टीका करूनही त्यांनी आमच्याविरोधात एकही टीका करणारी प्रतिक्रिया दिली नाही,'**
✦ सोनम वांगचुक

- राहुल गांधी आंदोलनात सहभागी झाले नाहीत, गीतांजली आंग्मो यांची टीका.
- उपोषण सोडवण्यासाठी राहुल गांधींना विनंती, पण प्रतिसाद मिळाला नाही, असा दावा.

'माझी पत्नी गीतांजली यांनी राहुल गांधींबाबत केवळ एकच टिप्पणी केली पण त्यावरून काँग्रेसने आम्हाला सोशल मीडियात खूप ट्रोल केले. मात्र भाजपवर आम्ही कठोर टीका करूनही त्यांनी आमच्याविरोधात एकही टीका करणारी प्रतिक्रिया दिली नाही,' अशा शब्दांत सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी भाजपचे कौतुक केले. पत्नी गीतांजली यांनी राहुल गांधींवर केलेल्या टीकेसंदर्भात वांगचुक यांनी आपली भूमिका मांडत भाजप आणि काँग्रेसमधील फरक दाखवून दिला.

नीट पेपरफुटी प्रकरणी वांगचुक यांनी जंतरमंतरवर उपोषण केले होते. पण भाजप सरकारने कुठेही वांगचुक यांच्यावर टीका केली नव्हती. उलट २० दिवस उपोषण करून त्यांची प्रकृती बिघडू लागल्यावर त्यांना रुग्णालयात नेले. या आंदोलनात राहुल गांधी सहभागी झाले नाहीत त्यावरून गीतांजली यांनी टीका केली तेव्हा मात्र काँग्रेसने या जोडप्याला भंडावून सोडले.

उपोषण संपल्यानंतर दिलेल्या एका मुलाखतीत वांगचुक म्हणाले, "माझ्या पत्नीने राहुल गांधींबाबत केवळ एकच टिप्पणी केली होती. पण भाजपवर चार–पाच अत्यंत कठोर टीका केल्या होत्या. त्या टीकेवर भाजपकडून कोणतीही प्रतिक्रिया आली नाही. मात्र, काँग्रेसच्या व्यवस्थेने मला आणि माझ्या पत्नीला सोशल मीडियावर ट्रोल करण्यास सुरुवात केली."

गीतांजली आंग्मो यांनी यापूर्वी राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पंतप्रधान निवासस्थानाबाहेर झालेल्या काँग्रेसच्या आंदोलनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. पेपरफुटीविरोधातील हे आंदोलन "प्रामाणिक नव्हते" असे म्हणत त्यांनी, राहुल गांधी यांनी जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनात सहभागी व्हायला हवे होते, असे मत व्यक्त केले होते. तसेच, सोनम वांगचुक २६ दिवस उपोषणावर असताना राहुल गांधी यांनी त्यांची भेट घेतली नाही किंवा उपोषण सोडवण्यासाठी कोणताही प्रयत्न केला नाही, अशी टीकाही त्यांनी केली होती.

याच संदर्भात वांगचुक यांनी आणखी एक दावा करत सांगितले की, राहुल गांधी यांनीच आपला उपवास सोडावा, अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी पत्नी गीतांजली आंग्मो यांनी सातत्याने प्रयत्न केले. मात्र, राहुल गांधींकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. "त्या राहुल गांधींच्या विरोधात नव्हत्या. उलट त्यांनीच माझा उपवास सोडावा, यासाठी त्या प्रयत्नशील होत्या," असे ते म्हणाले.

## हसीना समर्थक क्रिकेटपटू शाकिबच्या घरावर कट्टरवाद्यांचा हल्ला

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**घरावर दगडफेक करत पेट्रोल बॉम्ब फेकला**



बांगलादेशचा माजी कर्णधार आणि माजी खासदार शाकिब अल हसन यांच्या मँगुरा येथील घरावर अज्ञात हल्लेखोरांनी दगडफेक करत पेट्रोल बॉम्ब फेकल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात घराचे नुकसान झाले असून ते पेटवून देण्याचाही प्रयत्न करण्यात आला. विशेष म्हणजे, ही घटना शाकिब यांनी भारतात आयोजित माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या आभासी पत्रकार परिषदेत सहभाग घेतल्यानंतर अवघ्या काही तासांत घडली.

बुधवारी संध्याकाळी मँगुरा जिल्ह्यातील शाकिब यांच्या निवासस्थानावर अज्ञात व्यक्तींनी अचानक हल्ला केला. हल्लेखोरांनी घरावर दगडफेक केली आणि पेट्रोल बॉम्ब फेकून आग लावण्याचा प्रयत्न केला. स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी घराचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी अज्ञात हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

हल्ल्याची वेळ पाहता या घटनेला राजकीय पार्श्वभूमी असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. शाकिब अल हसन यांनी भारतातून आयोजित शेख हसीना यांच्या पत्रकार परिषदेत ऑनलाइन सहभाग घेतला होता. त्या परिषदेत शेख हसीना यांचे पुत्र सजीब वाझेद जॉय आणि अवामी लीगचे अनेक वरिष्ठ नेतेही सहभागी झाले होते. या सहभागानंतर काही तासांतच शाकिब यांच्या घरावर हल्ला झाल्याने या दोन्ही घटनांचा संबंध असू शकतो, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, पोलिसांनी अद्याप हल्ल्याचे नेमके कारण स्पष्ट केलेले नाही.

क्रिकेटमधील यशस्वी कारकिर्दीनंतर शाकिब अल हसन यांनी अवामी लीगमध्ये प्रवेश केला होता. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ते मँगुरा–१ मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले होते. मात्र, शेख हसीना सरकार सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर त्यांचे संसदीय सदस्यत्व संपुष्टात आले. त्यानंतर ते राजकीयदृष्ट्या चर्चेत राहिले आहेत.

## माफिया अतीक अहमदचा मुलगा अबान भीषण अपघातात ठार

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

**भावाला भेटून परतताना दुर्घटना**



**कोण होता अबान अहमद?**



**अबान अहमद हा माफिया आणि माजी खासदार अतीक अहमद याचा सर्वात धाकटा मुलगा होता. त्याचा मोठा भाऊ अली अहमद सध्या झाशी कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. या अपघाताची माहिती मिळताच रुग्णालय परिसर आणि संबंधित ठिकाणी पोलिसांनी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.**


झाशी–कानपूर राष्ट्रीय महामार्गावर पूंछ पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या भीषण रस्ता अपघातात माफिया आणि माजी खासदार अतीक अहमद याचा धाकटा मुलगा अबान अहमद याचा मृत्यू झाला. या अपघातात त्याच्या आणखी एका साथीदाराचाही मृत्यू झाला असून, तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, अबान अहमद आपल्या काही साथीदारांसह झाशी कारागृहात बंद असलेल्या मोठ्या भावाला अली अहमद याची भेट घेण्यासाठी आला होता. भेटीनंतर परतत असताना पूंछ परिसरात त्यांच्या कारचा भीषण अपघात झाला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. सर्व जखमींना तातडीने मोठ येथील सामुदायिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर अबान अहमदला मृत घोषित केले. अपघातात त्याच्या एका साथीदाराचाही मृत्यू झाला. उर्वरित तीन जखमींवर प्राथमिक उपचार करून त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना महाराणी लक्ष्मीबाई वैद्यकीय महाविद्यालयात पुढील उपचारासाठी हलविण्यात आले.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळ आणि रुग्णालयात दाखल झाले. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे. दोन्ही मृतदेहांचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, वाहनाचा वेग जास्त असल्याने चालकाचे नियंत्रण सुटून हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

## लैंगिक शोषणप्रकरणी तेहलकाच्या तरुण तेजपालला १० वर्षे सक्तमजुरी

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



तेहलकाचे माजी संपादक तरुण तेजपाल यांना २०१३ मधील लैंगिक अत्याचार प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने दोषी ठरवल्यानंतर आता १० वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. गोवा सत्र न्यायालयाने २०२१ मध्ये दिलेला निर्दोष मुक्ततेचा निकाल रद्द करत उच्च न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले आणि अमित जामसंडेकर यांच्या खंडपीठाने शिक्षा सुनावताना तेजपाल यांना दोन आठवड्यांच्या आत न्यायालयासमोर शरण येण्याचे निर्देश दिले.

संबंधित प्रकरण नोव्हेंबर २०१३ मधील आहे. गोव्यात आयोजित 'थिंकफेस्ट' कार्यक्रमादरम्यान एका पंचतारांकित हॉटेलच्या लिफ्टमध्ये तेहलकामध्ये कनिष्ठ पत्रकार म्हणून कार्यरत असलेल्या महिलेवर तरुण तेजपाल यांनी दोन वेळा लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. घटनेनंतर पीडितेने संस्थेच्या व्यवस्थापनाकडे ई–मेलद्वारे तक्रार केली. त्यानंतर गोवा पोलिसांनी स्वतःहून गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आणि ३० नोव्हेंबर २०१३ रोजी तेजपाल यांना अटक करण्यात आली.

मे २०२१ मध्ये गोवा सत्र न्यायालयाने पुराव्यांतील त्रुटी आणि तपासातील विसंगतींचा आधार घेत तरुण तेजपाल यांची सर्व आरोपांतून निर्दोष मुक्तता केली होती. मात्र, या निर्णयाला गोवा सरकारने मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात आव्हान दिले. सुनावणीदरम्यान राज्य सरकारने सत्र न्यायालयाने पुराव्यांचे चुकीचे मूल्यमापन केल्याचा युक्तिवाद केला. उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निर्णय रद्द करताना खालच्या न्यायालयाने पीडित महिलेच्या साक्षीकडे चुकीच्या दृष्टिकोनातून पाहिल्याचे नमूद केले.

उपलब्ध पुरावे आणि साक्षींचे मूल्यमापन कायद्याच्या निकषांनुसार करण्यात आले नसल्याने निर्दोष मुक्ततेचा निकाल टिकू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

>> अधिक वृत्त...५ वर



**२०२६ मध्ये एआय रोबोटची अवकाशात झेप**

## रोबो 'व्योममित्र' उघडणार भारताच्या गगनयान अंतराळ मोहिमेचे दार

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) च्या महत्त्वाकांक्षी 'गगनयान' मोहिमेअंतर्गत भारताचा पहिला कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अर्ध–मानवरूपी रोबोट 'व्योममित्र' २०२६ च्या उत्तरार्धात मानवरहित अंतराळ मोहिमेवर झेपावणार आहे. मानवी अंतराळ मोहिमेपूर्वीचा हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, या मोहिमेच्या यशानंतर २०२७ पर्यंत आणखी दोन मानवरहित चाचण्या घेण्यात येणार आहेत. त्यानंतर २०२७–२८ मध्ये भारतीय अंतराळवीरांना अंतराळात पाठवण्याचा मार्ग मोकळा होईल. इस्रोचे अंतिम लक्ष्य २०३५ पर्यंत भारताचे स्वतःचे भारतीय अंतराळ स्थानक उभारण्याचे आहे.



'व्योममित्र' हा केवळ रोबोट नसून भविष्यातील मानवी अंतराळ मोहिमेचा 'सहप्रवासी' असेल. हा AI–आधारित रोबोट अंतराळातील वातावरण, मानवी शरीरावरील परिणाम, क्रू मॉड्यूलमधील जीवनरक्षक प्रणालींची कार्यक्षमता आणि विविध तांत्रिक प्रणालींची तपासणी करणार आहे. त्याला मानवी संवाद साधण्याची क्षमता असून, पाय नसलेला हा अर्ध–मानवरूपी रोबोट उपकरणांवर लक्ष ठेवणे, आवश्यक बटणे कार्यान्वित करणे आणि पृथ्वीवरील मिशन कंट्रोलशी थेट संवाद साधणे अशी महत्त्वाची कामे पार पाडणार आहे.

गगनयान मोहिमेसाठी इस्त्रोला रशियाची रोस्कोस्मोस, फ्रान्सची CNES, युरोपियन स्पेस एजन्सी (ESA) आणि ऑस्ट्रेलियन स्पेस एजन्सी यांचे तांत्रिक सहकार्य मिळत आहे. या सहकार्यामुळे भारतीय मानवी अंतराळ कार्यक्रमाला जागतिक स्तरावरील तांत्रिक बळ मिळणार आहे.

दरम्यान, भारताच्या पहिल्या मानवी अंतराळ मोहिमेसाठी ग्रुप कॅप्टन प्रशांत बालकृष्णन नायर, अजित कृष्णन, अंगद प्रताप आणि विंग कमांडर शुभांशु शुक्ला या चार गगनॉट्सची निवड करण्यात आली आहे. 'व्योममित्र'ची मोहीम यशस्वी ठरल्यानंतर या अंतराळवीरांना अवकाशात पाठवण्याच्या दिशेने इस्त्रो आणखी एक ऐतिहासिक पाऊल टाकणार आहे.